माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०१/२०२१/२०२१/५२ दिनांक-१५.०२.२०२१

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :२४.१२.२०२०
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:२५.०१.२०२१
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :२८.०१.२०२१
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :१५.०२.२०२१

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०१/२०२१**

**अपीलकर्ता:** श्री. विकास शिवाजी सोनावणे

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक २५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २८.०१.२०२१ रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०१.०२.२०२१ रोजी नोटिस पाठवून दिनांक १२.०२.२०२१ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

### ३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

१) दिनांक १९/०३/२०२० रोजी विकास सोनावणे यांनी म.वि.नि.आ. कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत कार्यालयात केलेल्या अंतिम कार्यवाहीची साक्षांकित प्रत मिळावी.

२) दिनाक ११/०४/२०१९ रोजी श्रीमती हेमलता मोती यांनी कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत कार्यालयाने जी काही कार्यवाही केली आहे, त्याबाबतचे संपूर्ण कागदपत्रे साक्षांकित प्रतीमध्ये मिळावी.

३) अवर सचिव अरूण वाळुंज यांची सन २०१८ रोजी कार्यालयातील चौकशीच्या संपूर्ण फाईलची टिपणी व चौकशी अहवालाची प्रत साक्षांकित प्रतीमध्ये मिळाव्यात, ही विनंती.

४) अरूण वाळुंज यांची कक्ष अधिकारी पदाच्या पदभर्तीचे तसेच कार्यालयातील निवड सूचीबाबतची संपूर्ण कागदपत्रे आणि पदोन्नतीच्या विषयक संपूर्ण कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. (सन २००९ ते आजतागायत)

**<u>जन माहिती अधिकारी यांचे वरील मुद्दानिहाय उत्तर :-</u>**

१) याबाबत कार्यवाही सुरु आहे. अद्याप कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे आपणांस माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८ (ज) नुसार माहिती उपलब्ध करून देता येत नाही.

२) कार्यालयाच्या अभिलेखानुसार आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे (एकूण पृष्ठे-१६) प्रती सोबत जोडल्या आहेत.

३) कार्यालयाच्या अभिलेखानुसार अवर सचिव यांची कार्यालयात चौकशी झालेली नसल्याने याबाबची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

४) कार्यालयाच्या अभिलेखानुसार आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे (एकूण पृष्ठे-९)प्रती सोबत जोडल्या आहेत.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

दिनांक २४.१२.२०२० रोजी आपल्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम (१) प्रमाणे माहिती अधिकार सादर केला होता. सदर माहिती मध्ये मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर अपूर्ण, चुकीचे तसेच दिशाभूल करणारे आहे. सदर उत्तरामध्ये अद्याप अरूण वाळुंज यांची सन २०१८ रोजी कार्यालयातील संपूर्ण फाईलीची टीपणी बद्दल माहिती दिलेली नाही, असे दिसून येते. सदर माहिती अप्राप्त अपूर्ण तसेच चुकीची दिलेली आहे. सबब, माहिती अधिकार अर्जामधील मुद्दा

क्रमांक ३ बद्दल ची संपूर्ण कागदपत्रांची साक्षांकित प्रती अपिलात मिळाव्यात, तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपिलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेले मौखिक निवेदन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान समजून घेतले. प्रतिवादी/माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.३ ला दिलेले उत्तर अपूर्ण आहे हे म्हणणे/निवेदन अपिलार्थी यांनी केले असता मुद्दा क्र.३ चे निरीक्षणाअंती असे दिसून येते की, वास्तविकता त्यामध्ये दोन मुद्दे आहेत-

पहिला मुद्दा- अवर सचिव अरूण वाळुंज यांची सन २०१८ रोजी कार्यालयातील चौकशीच्या संपूर्ण फाईलची टिपणी आणि,

दुसरा मुद्दा- चौकशी अहवालाची प्रत. (मुद्दा क्र.१ व २) साक्षांकित प्रतीमध्ये मिळाव्यात.

प्रतिवादी/माहिती अधिकारी यांनी फक्त अवर सचिव यांची कार्यालयात चौकशी झालेली नसल्याने याबाबतची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे उत्तर दिलेले आहे, परंतू त्यातील पहिला मुद्दा हा गौण आहे, त्या अनुषंगाने कार्यालयातील टिपणी उपलब्ध आहेत किंवा कसे? त्याकरीता, अपीलय अधिकारी यांनी प्रतिवादी/माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता नस्ती मध्ये टिपणी उपलब्ध असून, चौकशी न झाल्याने चौकशी अहवाल उपलब्ध नसल्याचे सांगितले.

अपिलार्थी यांनी त्यांना टिपणीची प्रत मिळण्यास काही हरकत नाही, ते उपलब्ध करून देण्याचे सांगितले. अपिलार्थी यांनी दि.१५.०२.२०२१ रोजी च्या अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांना आवक पत्र क्र.०५७१ दिनांक १५.०२.२०२१ ला देवून त्याचे लेखी जबाब या अपिलात समाविष्ट करण्याची विनंती केले आहे.

वरील अपिलार्थी/प्रतिवादी यांचे मौखिक निवेदन व नस्ती मधील दस्तऐवजावरून अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेले मुद्दा क्र.३ च्या अनुषंगाने कार्यालयीन टिपणी द्यावे किंवा नाही यावर अपिलीय अधिकारी यांनी आपले लक्ष वेधून घेतले.

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या प्रकरण क्र-१ मधील कलम २ अन्वये मधील व्याख्यानुसार-२ (त्र) *'माहितीचा अधिकार' याचा अर्थ, "कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये-*

*(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;*

*(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे;*

*(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;*

*(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही*

*उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रीत प्रती (प्रिन्टआऊट) मार्फत माहिती मिळविणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो."*

*या कायद्याच्या कलम २ (च) नुसार - "कायद्याच्या कलम ८ व ९ मध्ये अपवाद केलेल्या माहितीशिवाय आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचा समावेश या व्याख्येत होतो. नस्ती (फाईल्स), अभिलेख (रेकॉर्ड), दस्तऐवज (डॉक्युमेंटस), ज्ञापने (मेमो), ई-मेल, अभिप्राय, सल्ला, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या (लॉगबुक), संविदा (कॉन्ट्रॅक), अहवाल, कागदपत्रे इ, हस्तलिखित व मुद्रीत स्वरुपातील माहितीचा समावेश या व्याख्येत आहेच. शिवाय इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील माहिती उदा. ई-मेल, संगणकात संग्रहित असलेली माहिती, फ्लॉपी, सीडी, पेन ड्राइव्ह, ऑडीओ-व्हीडीओ कॅसेटस इ. मध्ये साठवलेल्या माहितीचा समावेशही या व्याख्येत होतो.*

*महत्वाची गोष्ट म्हणजे बरेचदा खाजगी व्यक्ती अथवा संस्थेविषयी कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती जमा झालेली असते. त्याचाही समावेश माहिती या व्याख्येत झालेला आहे. नमुने (सॅम्पल), प्रतिमाने (मॉडेल), यांचाही समावेश या व्याख्येत करण्यात आलेला आहे.*

*बरेचदा कार्यालयीन टिप्पणीवर वरिष्ठ अधिकारी किंवा संबंधितांनी आपले अभिप्राय, शेरे, नोंदी, मत, सूचना इ. लिखित स्वरुपातील माहिती ही देता येते. जन माहिती अधिकाऱ्याने स्वत:चे वैयक्तिक मत, सूचना, अभिप्राय देणे या कायद्याला अभिप्रेत नाही."*

त्याअनुषंगाने मा. मुख्य माहिती आयुक्तांनी - अपिल क्रमांक २००६/२०२१/०२,

***अपिलकर्ता- वर्षा अनंत बनसोड***

***विरूध्द***

***उत्तरवादी- उपसचिव (सेवा), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई***

*"या अपिलात व इतरही अनेक प्रकरणात फाईल नोटींग देता येतात, दिल्या पाहिजे असा स्पष्ट निर्देश दिला आहे. महाराष्ट्र शासनानेही असे निर्देश दिलेले आहेत."* असे नमूद केले आहे.

या व्यतिरिक्त केंद्रीय माहिती आयोगा समोरील द्वितीय अपिल क्र.- [Second Appeal No. CIC/MHOME/A/2017/609431] ६०९४३१ पारित दिनांक १४/०६/२०१९

**उज्वला कोकडे**

**विरूध्द**

**सी.पी.आय.ओ (केंद्रीय जन माहिती अधिकारी)**

यांच्या आदेशात असे म्हटले आहे की -

*"11. In view of the above, the Commission notes that the file noting and correspondence received or sent by the Ministry of Home Affairs pertaining to the appellant's mercy petition which is not a part of the Ministerial advice to the President as well as the file noting relating to the file of the mercy petition file by Shri Pradeep Yeshwanth Kokde as sought by the appellant can be provided to the appellant. The Commission, however, observes that the file*

*noting and the correspondence could contain the names of the officials recording the same, the disclosure of which would endanger the life or physical safety of these officials and hence its disclosure is exempted under Section 8(1)(g) of the RTI Act. In view of this, the Commission directs the respondent to provide the information sought for, after severing all the names and other references which could reveal the identities of the public officials concerned, to the appellant within a period of four weeks from the date of receipt of a copy of this order under intimation to the Commission."*

वरिल दोन्ही केंद्रीय माहिती अयोग व राज्य माहिती आयोगाच्या आदेशावरुन असे निष्कर्षास येते की, फाईल नोटींग देता येतात व त्या देण्यात याव्या.

करिता, प्रतिवादी/माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांना या आदेशानंतर ताबडतोब सात (७) दिवसांत, अपिलार्थी यांनी केलेल्या मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने कार्यालयातील उपलब्ध असलेल्या टिप्पणी उपलब्ध करून द्याव्यात.

अपील मंजूर करण्यात येवून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**<u>निर्णय</u>**

अपील मंजूर करण्यात येवून निकाली काढण्यात येत आहे.

15.02.2021

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. विकास शिवाजी सोनावणे,
बि.नं.७, रुम नं. ११०३,
शासकिय वसाहत,
बांद्रा पूर्व, मुंबई-४०० ०५१.
मो.नं.८४२२९९९१०४.

15.02.2021

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**